**म.सं.कौ.हि.का.अर्ज क्र.२/२०२१**
सुलताना ज. कुटवाडे इतर २
**विरुध्द**
गुजरातबी नि. कुटवाडे वगैरे ५

## निशाणी क्रमांक २२ खालील आदेश

अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज सादर करुन असे कथन केले आहे की, अर्जदार यांनी दिनांक २४.०९.२०२१ रोजी फेरिस्त नि.क्र.३ सोबत अनुक्रमांक १ ते ४ कडे काही छायांकित कागदपत्राच्या प्रती दाखल केल्या असून त्यापैकी नोटराईज्ड दस्त क्र.१६४५/२०२१ व १६४७/२०२१ या कागदपत्रांच्या मुळ प्रती जाबदार क्र.२ व ३ यांच्या कब्जात आहेत. सदरची कागदपत्रांच्या मूळ प्रती प्रस्तुत कामी दाखल करणे आवश्यक असल्याने जाबदार यांनी ती न्यायालयात हजर करावे. सदरची कागदपत्रे नोंदणीकृत असल्यामुळे त्याच्या प्रमाणित प्रती मिळणे अशक्य आहे. सबब, जाबदार यांनी मूळ कागदपत्रे प्रस्तुत कामी दाखल करावे व त्याची सत्यता छायांकित प्रतीनुसार पडताळून त्यास निशाणी द्यावे अशी विनंती केली.

०२. जाबदार क्र. १ ते ४ यांनी नि.क्र.२४ वर म्हणणे सादर करुन असे प्रतिकथन केले आहे की, फेरिस्त नि.क्र.३ सोबत दाखल कागदपत्रांपैकी अ.क्र.३ व ४ कडील कागदपत्रे जाबदार यांना मान्य आहे. सदरची कागदपत्रे जाबदार यांनी अर्जदार यांच्या विरुध्द केलेल्या दिवाणी दाव्यात हजर केलेली

आहेत. त्यामुळे अर्जदार यांनी फेरिस्त नि.क्र.३ सोबत दाखल केलेले अ.क्र.३ व ४ कडील बक्षिसपत्रांच्या छायांकित प्रतीस निशाणी देणेस जाबदार यांची संमती आहे.

**०३.** दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. अर्जदार यांनी फेरिस्त निशाणी क्र.३ सोबत अ.क्र.१ ते ४ कडे छायांकित प्रति दाखल केल्या आहेत. त्यापैकी अ.क्र.३ व ४ हे दस्त नोटराईज्ड हिब्बानामा असून त्यांचे मूळ दस्त जाबदार यांनी अर्जदार यांच्याविरुध्द दाखल केलेल्या दाव्यात समाविष्ट केले आहेत. दोन्ही बाजूचा युक्तीवाद विचारात घेता जाबदार यांनी नोटराईज्ड हिब्बानाम्याच्या छायांकित प्रतींना निशाणी क्रमांक देण्यास हरकत नाही असे केलेले कथनावरुन मूळ हिब्बानामा प्रस्तुत प्रकरणात दाखल करण्याची आवश्यकत नाही. सबब, खालील आदेश.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

२. फेरिस्त नि.क्र.३ सोबत अनुक्रमांक ३ व ४ कडे दाखल कागपत्रास निशाणी क्रमांक देण्यात येते.

सही/-

मिरज ( वि.वि.खुळपे )

दि.११.०१.२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

मिरज